# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
दाखल झालेले अपील

RTI
Inward No. 274
Date: 7/7/16

रामाआ- अपील क्र. बीएम - १४९/२०१६

अपिलार्थी श्री.आर.एस.मिश्रा
शॉप नं.२२/२३, खारवा गल्ली, अकबर पिरबाई कॉलेजजवळ
एस.एस.अली रोड, मुंबई -४०० ००८.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, १७९-सायन कोळीवाडा, म्हाडा, गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता -२ (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा, गृहनिर्माण भवन,बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

State Information Commission
Greater Mumbai

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०१६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाच्या दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०८.२०१५ | | ०५.१०.२०१५ | ३०.१०.२०१५ |

अपीलकर्त्यांने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम - ६ (१) खाली दि. २७.०८.२०१५ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, संसद सदस्य/आर.एस.एस/ विधानसभा सदस्य/ विधान परिषद यांच्यासाठी विशेष व सर्वसाधारण निधी व इतर शासकीय निधी संबंधी अर्जात नमूद सात मुद्यांची माहिती मागितली होती.

9C3 09/12/16

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन अपीलार्थींनी दि.०५.१०.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.१०.२०१५ रोजीच्या

pertains to PRO city
M/28

आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या अभिलखात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.

अपीलकर्त्यांने आयोगाकडे दि.१२.०१.२०१६ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे कळविले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसांत कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असे आदेश होऊन देखील जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. तसेच त्यांनी प्रथम अपील नकारले आहे.

व्दितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतीही अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही. तसेच, प्रथम अपिलाची सुनावणी व निर्णय झाला नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली नाही. तथापि, अपिलार्थींनी मूळ अर्जातील विचारलेली माहिती अत्यंत व्यापक स्वरूपाची असून, त्यात कोणत्याही विशिष्ट कामाचा उल्लेख केला नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील नं. ६४५४ / २०११ दिनांक ९ ऑगस्ट २०११ रोजी Central Board of Secondary Education & Anr. Vs. Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत :-

"The Act should not be allowed to be misused or abused, to become a tool to obstruct the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to out of their duty. The nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spend 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees o f a public authorities prioritizing 'information furnishing', at the cost of their normal and regular duties."

उक्त आदेश विचारात घेता आयोग पुढील आदेश देत आहे :

## आदेश

**अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

अजित कुमार जैन

(अजित कुमार जैन)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : २७.०६.२०१६

State Information Commission ★ Greater Mumbai ★